# खरड छाटणीनंतरच्या संभाव्य रोगांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना

डॉ. सुजोय साहा, सुमंत कबाडे, डॉ. आर.जी. सोमकुंवर

## द्राक्ष सल्ला

सामान्यपणे द्राक्ष बागेमध्ये २ वेळा छाटणी घेतली जाते. फळकाढणी झाल्यानंतर लगेच खरड छाटणी घेतली जाते. ओलांड्यावर फक्त एक डोळा ठेवून जुनी काडी पूर्णपणे काढून टाकण्याच्या प्रक्रियेला 'खरड छाटणी' असे म्हणतात. खरड छाटणीच्या व्यवस्थापनावर जवळपास ८० टक्के घडनिर्मिती व चांगल्या दर्जाचे उत्पादन अवलंबून असते. आर्थिक नुकसान टाळण्यासाठी योग्यप्रकारे रोग व्यवस्थापन करणेदेखील महत्त्वाचे आहे.

सध्या द्राक्षपट्ट्यामध्ये खरड छाटणीचा हंगाम सुरू झाला आहे. मागील काही दिवसांत द्राक्ष पट्ट्यात अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरण अशी स्थिती पाहायला मिळते. तापमानात घट आणि आर्द्रतेमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. पुढील काही दिवसांमध्ये पुन्हा तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. अनुकूल हवामान परिस्थितीमुळे द्राक्ष बागेत विविध रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. खरड छाटणीनंतर बागेत प्रामुख्याने बुरशीजन्य करपा (कोलेटोट्रीकम ग्लेओस्पोरॉइडीस), जिवाणूजन्य करपा, केवडा (प्लास्मोपॅरा विटिकोला) आणि भुरी (इरिसिफे निकेटर) हे रोग आढळून येतात. योग्यवेळी उपाययोजनांचा अवलंब केल्यास संभाव्य नुकसान टाळले जाईल.

- पिकाची काढणी आणि छाटणी पूर्ण झाल्यानंतर १-२ दिवसांनी वेलीवरील अनियमित वाढलेले आणि न काढलेले घड काढून खड्ड्यांमध्ये गाडून टाकावेत.
- बऱ्याच वेळा छाटणी केलेल्या काड्या, पाने बागेजवळ उघड्यावर टाकल्या जातात. पाऊस पडल्यानंतर या भागांवर करपा, डाऊनी यासारख्या रोगांचे बिजाणू हवेद्वारे नवीन आलेल्या फुटवे आणि काड्यांवर जातात. त्यासाठी रोगग्रस्त भाग किंवा जुन्या फांद्या नष्ट करून बाग स्वच्छ ठेवावी.
- काडीच्या खालील भागावर रोगाचे उरलेले इनॉकुलम नष्ट करण्यासाठी मॅन्कोझेब किंवा मेटिराम किंवा थायरम २ ग्रॅम अधिक हायड्रोजन सायनामाइड २५ ते ३५ मिलि प्रतिलिटर पाणी प्रमाणे फवारावे.
- ओलांड्यावरील वाळलेले लाकडी भाग काढून टाकावेत. कापलेल्या ठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट लावावी किंवा बागेत १ टक्के बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. तसेच ओलांडे मॅन्कोझेब किंवा मेटिराम किंवा झायरम आणि सल्फर २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे या बुरशीनाशकांनी धुवून घ्यावेत.
- खरड छाटणी झाल्यानंतर जैविक बुरशीनाशक मांजरी ट्रायकोशक्ती (भुकटी) १० ग्रॅम प्रति एकर ड्रीपद्वारे आळवणी करावी. आणि मांजरी वाईनगार्ड द्रावण २ ते ५ मिलि प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. त्यामुळे वेलीच्या बुंध्याजवळ मातीत असलेले रोगाचे अवशेष नष्ट होण्यास मदत होईल. राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी पुणे येथे ट्रायकोडर्मा मांजरी, ट्रायकोशक्ती (भुकटी) आणि मांजरी वाईनगार्ड (द्रावण) उपलब्ध आहे .
- पाऊस सुरू झाल्यानंतर जमिनीच्या जवळ मुख्य खोडावरील फुटी किंवा नवीन बागेतील जमिनीवरील खोडांवरची पाने काढून टाकावीत.
- तारांवरून जमिनीच्या दिशेने लोंबत असलेल्या काड्या तारांवरती बांधून घ्याव्यात किंवा खाली लोंबणारी काडीची वाढ १२ ते १३ पानांच्या पुढची असेल तर ती छाटून घ्यावी. यामुळे नवीन वाढणारी पाने व फांद्या मातीपासून दूर राहतील. तसेच मातीमधील रोगाचे अवशेष मांडव किंवा ट्रिलायसिस काड्यांवर सहज पोचत नाहीत. वादळी पाऊस असेल तरच चिखलाचे शिंतोडे किंवा पाणी रोगांचे अवशेष पानांपर्यंत पोचविण्यास मदत करतात.
- नाशिकमधील सटाणा भागातील बाग खरड छाटणी होऊन सद्यःस्थितीत ५-७ पानांची अवस्थेत आहेत. अशा परिस्थितीमध्ये मॅंकोझेब किंवा मेटीराम किंवा थायरम या बुरशीनाशकांची २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. सात दिवसांनी पुन्हा यापैकी एका बुरशीनाशकाची फवारणी करावी.

– डॉ. आर.जी. सोमकुंवर,
९४२२०३२९८८
(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, पुणे)